महाराष्ट्र शासन
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग
# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय परिसर, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई ४००००१
Website: https://dvet.gov.in Email: director@dvet.gov.in दुरध्वनीक्र.:०२२-२२६२०६०३/०२९३

क्रमांक :व्यशिप्र/आस्था-५/विनंती बदली /२०२६/का-४
दिनांक :- २५/०६/२०२६

प्रति,
सहसंचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय,
मुंबई /पुणे/ नाशिक/ नागपूर/ अमरावती / छत्रपती संभाजीनगर.

संचालक,
कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ,मुंबई- ८१.

विषय - गट-क संवर्गातील विशेष विनंती बदली २०२६ ऑनलाईन प्रक्रियेसंदर्भात गठित केलेल्या समितीने दिलेल्या अहवालानुसार बदली प्रक्रियेची पुढील कार्यवाही करणेबाबत

दिनांक ०९/०४/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार बदल्यांचे धोरण राज्यात लागू असून कौ.वि व उ विभाग यांच्या दिनांक २०/०९/२०१९ च्या शासन निर्णयान्वये बदल्या ऑनलाईन पध्दतीने करण्याची कार्यप्रणालीस मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार गट क संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या विनंती बदल्या २०२६ ऑनलाईन पध्दतीने करण्याच्या अनुषंगाने बदल्याचे वेळापत्रक प्रसिध्द करण्यात आलेले आहे.सदर वेळापत्रकानुसार ऑनलाईन बदल्यांची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.विनंती बदल्याकरीता आलेल्या अर्जाची संख्या, सद्य:स्थितीत संस्थेमध्ये सुरु असलेले प्रवेश, प्रशिक्षण व प्रशासनाच्या सोयीच्या दृष्टीने काही धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक असल्याची बाब संचालनालयाच्या निदर्शनास आल्याने दिनांक २३/६/२०२६ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये समिती गठित करण्यात आली.

सदर समितीचा अहवाल मा. संचालक यांच्याकडे सादर करण्यात आलेला असून समितीने दिलेल्या सूचनेनुसार विनंती बदल्या २०२६ (ऑनलाईन प्रणाली) मध्ये पुढील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत-

१) विनंती बदली मध्ये प्रथम: अवघड / आदिवासी क्षेत्रातील जागा प्रथम प्राधान्याने भरण्याची कार्यवाही करण्यात यावी.

२) आदिवासी अथवा अवघड क्षेत्रातील बहतांश कर्मचाऱ्यांनी विनंती बदलीसाठी अर्ज केल्याचे दिसून येत आहे. प्रशिक्षण व प्रशासकीय निकड पाहता अशा संस्थामधील कर्मचाऱ्यांच्या विनंती बदलीच्या अनुषंगाने किमान ५०% संस्थेतील सर्व संवर्गामध्ये कर्मचारी उपलब्ध होतील,या अनुषंगाने रिक्त पदांचे नियोजन करण्यात यावे.

३) नियतकालीक बदली २०२६ मध्ये स्थगिती (Retention) घेतलेल्या कर्मचाऱ्यांना विनंती बदली अनुज्ञेय करण्यात येऊ नये.

४) विनंतीच्या प्रक्रियेमध्ये विभागीय बदलीसाठी अर्ज केलेले दिसून येत आहेत त्यांना हया प्रक्रियेतून वगळणे आवश्यक राहील.

५) दिनांक ३० जून २०२६ रोजी सेवानिवृत्तीने होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या जागा विशेष विनंती बदली २०२६ करीता खुल्या करण्यात याव्यात.

६) नियतकालीक बदली २०२६ मध्ये रिक्त पदांची स्थिती (फ्रिज अनफ्रिज) यथास्थिती (जैसे थे) ठेवण्यात याव्यात.

७) शासनाच्या बदलीच्या धोरणानुसार दिनांक ०९/०४/२०१८ रोजीच्या सामान्य प्रशासन विभागामधील तरतूदीनुसार होईल याची दक्षता घेण्यात यावी.

८) सद्य:स्थितीत विनंती बदल्या २०२६ ची ऑनलाईन प्रक्रिया तात्पुरती बदली पात्र कर्मचाऱ्यांची यादी (Provisional Due List) संचालनालयाच्या स्तरावर (Director Login) Reject/Approved करण्याच्या स्तरावर येऊन ठेपलेली आहे.

९) समितीच्या अहवालानुसार सर्व संस्था व कार्यालय स्तरावर ५० टक्के कर्मचारी उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने प्रादेशिक स्तरावर नियोजन करणे आवश्यक असल्याने प्रादेशिक स्तरावरील Reject/Approved च्या स्थितीमध्ये बदल संभवतो. करिता त्याप्रमाणे होणाऱ्या बदलाची माहिती सर्व प्रादेशिक कार्यालयांनी संचालनालयास दिनांक २९/६/२०२६ पर्यंत ईमेलद्वारे पाठवावी.

तरी वरील बाबी व समितीच्या अहवालानुसार विनंती बदल्या २०२६ चे सुधारित वेळापत्रक सोबत पुढील कार्यवाहीस्तव देण्यात येत आहे. सदरचे वेळापत्रक Round-१ पर्यंतचे असून पुढील प्रक्रियेबाबत यथावकाश कळविण्यात येईल. विनंती बदल्यांची कार्यवाही सदर वेळापत्रकानुसार काटेकोरपणे होईल याची दक्षता घेण्यात यावी.

(सतिश रु.सुर्यवंशी)
संचालक

प्रत : १)कार्यसन क्रमांक १६ मुख्य कार्यालय मुंबई यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव
२) कार्यसन अधिकारी,कार्यासन क्रमांक २ यांना माहितीकरीता व पुढील कार्यवाहीस्तव

# REQUEST TRANSFER 2026 REVISED TIME TABLE

| Sr. No | Stage | Schedule |
|---|---|---|
| 1. | Update Post Information | 15th June to 17th June 2026 |
| 2. | Updating Employee Profile Including Posting History, Present Posting Details, employee profile verification (Principle / Desk / Officer) | 15th June to 17th June 2026 |
| 3. | Fill Preference for Transfer in Employee Log in<br>1st Level Verification in Principle Log in and 2nd Level Verification in Joint Director Log in | 18th June 2026 |
| 4. | Request Transfer List Joint Director Log In (First Level – all appointing authority will approve or reject with remarks) | 18th June 2026 |
| 5. | Request Transfer List Director Log In (Final approving authority will approve or reject with remarks) | 29th June to 01st July 2026 |
| 6. | Vacancy List – Generate Transfer Vacancy List | 01st July and 02nd July 2026 |
| 7. | Update Vacancies for remaining post / cadre | |
| | **1 st ROUND** | |
| 8. | Fill Location Preferences by Employee (Only Difficult Area Vacancies are available for Selection) | 03st July 2026 |
| 9. | Transfer List with Location Preferences | 06st July 2026 |
| 10. | C.S.B List Meeting at Regional Level | |
| 11. | Generate Transfer Order<br>Publish Round – 1 request transfer allocation List<br>Publish Remaining Employee List.<br>Publish Remaining Vacancy List. | 07th July 2026 |
| 12. | **2nd ROUND** | Will be declared later. |
| 13. | **3rd ROUND** | Will be declared later. |